राज्योन्नती

# मोरगाव येथे सायबर गुन्ह्यांनविषयी मार्गदर्शन

**प्रतिनिधी/ २६ ऑक्टोबर**

**मोरगांव (भाकरे):** दि.स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाअंतर्गत सायबर गुन्हे म्हणजे काय आणि हे गुन्हे होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन संपन्न झाले. हा उपक्रम शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांनी क्विक हील फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने आयोजित केला होता. यावेळी समन्वयक डॉ. हरिदास खराट, सायबर वॉरियर्स अभिषेक वाडड, सार्थक ठाकरे, अभय सुरडकर , निशांत आगरकर यांनी ग्रामस्थांना ओटीपी , फेक मेसेज, फेक बँक कॉल्स, ई के वाय सी, पीक विमा, शेतकऱ्यांशी संबंधित विविध पद्धतीने कशी ऑनलाईन फसवणूक होते आणि यापासून आपण कसे सुरक्षित राहावे याविषयी सविस्तर



माहिती सांगितली. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करतांना कोणती काळजी घ्यावी या विषयी मार्गदर्शन केले आणि आवश्यक तेव्हाच वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सरपंच उमा ज्ञानेश्वर माळी, उपसरपंच, प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

Akola Edition
Oct, 27 2023 Page No, 4
https://epaper.dainikrajyonnati.com